value. "sick," "weary," "big," "tall," "far heavier," and "friend of" are examples of two-valued logic predicates. To use more than two quantifiers, "all" and "some," in either two-valued or multivalued logic, is strictly prohibited. The fuzzy quantifiers like "most," "many," and "many" are permitted in contrast to the strict quantifiers of strict logic, but strict logic does not allow the use of the fuzzy quantifiers. These quantifiers could be viewed as inaccurate representations of the cardinality of one or more fuzzy or nonfuzzy sets. A fuzzy quantifier is a second-order fuzzy predicate in this case. For example, fuzzy quantifiers can be used to clarify the meaning of fuzzy propositions, allowing for the adjustment of probabilities in fuzzy logic. Not, highly, more or less, very, slightly, much, and a little can all be described by using fuzzy logic to characterise predicate-modifiers that are otherwise non-fuzzy or fuzzy [11].

The multitude of fuzzy logics calls for a general unifying (meta) theory. Indeed, many meta-mathematical properties, such as general and linear completeness theorems or the linear subdirect representation theorem, can be proved generally for large classes of logics delimited by simple (e.g., syntactic) criteria. The basic metamathematical properties of fuzzy logics [12]. We restrict ourselves to (4-)core fuzzy logics, even though most of the definitions can be formulated and most of the results proven in weaker logics (e.g., non-commutative, non-integral, with restricted language, etc.).

4. Proof theory of mathematical logic for fuzzy logic

Proof theory for fuzzy logics (with the exception of Godel logic, whose position as ¨ both fuzzy and intermediate logic makes it a special case) has seen a rapid development in recent years. The field has been started by Metcalfe in the early 2000's; a milestone is the monograph. In this Handbook, the proof theory of fuzzy logics is treated.

The notions relativized to other important classes of algebras and for logics other than (Δ-)core, and also tackles other complexity problems encountered in mathematical fuzzy logic (e.g., the complexity of the provability relation of a propositional fuzzy logic, or even of the universal fragment of the first-order theory of particular classes of algebras)[13].

Such calculi (e.g., the Gentzen-style sequent calculi) are in many respects better behaved (e.g., as regards the complexity of proofs) than the Hilbert-style calculi employed in this chapter so far. Unlike general Hilbert-style calculi, which trivially exist for all logics (understood as consequence relations), the construction of calculi satisfying some required properties can be a non-trivial task, in many cases even demonstrably impossible [14]. Hypersequents were originally introduced by Avron as a proof-theoretic framework for the Relevance-Mingle logic RM. Later the hypersequent calculi were generalized to Godel logic and other fuzzy logics. As an example of a hypersequent calculi for fuzzy logics, we present here a hypersequent Gentzen-style calculus for the logic IMTL [15].

5. Conclusion

Fuzzy type theory FTT was originally defined over the logic IMTL4; later it has been generalized to several other logics, including Ł4, BL4, and ŁΠ. Being a Church-style type theory, it is not formulated in the language of first-order fuzzy logic, but in the typed λ-calculus. the theory of intended models of FCT is not recursively axiomatizable (for the same reasons as in classical higher-order fuzzy logic, namely the definability of true arithmetic), FCT is only complete w.r.t.

its general models, in which Un+1,1 can be a proper subset of L Un (closed under all definable operations) and Un a proper superset of S k∈N Un,k. Thus, not all fuzzy subsets of Un (i.e., functions Un → L) may be represented as a fuzzy class (i.e., an element of Un+1,1) in a general model of FCT; 82 nevertheless, the axioms of comprehension ensure that at least all fuzzy subsets of Un definable in the language of the theory are represented by elements of Un+1,1.

Fuzzy logic has a wide range of practical applications that are not limited to engineering and adjacent industries. Expert systems that employ fuzzy inference can aid clinicians in the early detection of diabetes and prostate cancer, among other diseases. Aside from that, the use of fuzzy logic concepts and approaches has helped fields such as management science, financial analysis, information retrieval, linguistics, and the behavioral sciences.

In fuzzy logic, as in any mathematical logic, there is a clear boundary between syntax and semantics. While semantics is frequently multivalued and based on an algebraic structure of truth values, syntax might be traditional or evaluated. Fuzzy logic has a broader set of connectives and logical axioms than classical logic, but the inference methods are the same. Fuzzy logic using classical terminology, including first-order, is complete, meaning that a formula can only be proven if and only if it holds in all models.

Fuzzy logic with evaluated syntax (J. Pavelka, V. Novák) is a more drastic departure from classical logic. An evaluation formula a/A is at the core of this theory; it's a lower bound on the truth value of A in any model, and a represents the formula's syntactic evaluation. This allows us to accept axioms that don't need to be completely compelling. Along with, this research has followed only set theory as a brief but the combinations of fuzzy logics with number of model theory in binary logics can be recommended with this research. The computability theory is inextricably linked to the study of computability in mathematical logic which is not followed in this research, hence the researcher has been recommended to do research in computability theory in mathematical logics.

References

1. Zhang, Z. (2013). Interval-valued intuitionistic hesitant fuzzy aggregation operators and their application in group decision-making.*Journal of Applied Mathematics*,*2013*, 1–33. https://doi.org/10.1155/2013/670285
2. Inearat, L., & Qatanani, N. (2018). Numerical methods for solving fuzzy linear systems. *Mathematics*,*6*(2),19. https://doi.org/10.3390/ math6020019
3. Seising, R. (2018). The emergence of fuzzy sets in the decade of the perceptron—Lotfi A. zadeh's and Frank Rosenblatt's research work on pattern classification. *Mathematics*,*6*(7), 110.https://doi.org/10.3390/math6070110
4. Lotfi A. Zadeh. Fuzzy sets. Information and Control 8 (1965) 338–353.
5. Godo, L., & Gottwald, S. (2015). Fuzzy sets and formal logics.*Fuzzy Sets and Systems. An International Journal in Information Science and Engineering*,*281*, 44–60.
6. Běhounek, L., & Cintula, P. (2007). Features of mathematical theories in formal fuzzy logic. In*Lecture Notes in Computer Science* (pp. 523–532). Springer Berlin Heidelberg.
7. Giangiacomo Gerla. Fuzzy Logic. Mathematical Tools for Approximate Reasoning. vol. 11 of Trends in Logic, Kluwer Academic Publishers, 2001.

8. Novak, Vilem & Perfiljeva, Irina & Mockor, Jiri. (1999). Mathematical Principles of Fuzzy Logic. 10.1007/978-1-4615-5217-8.
9. Petr H´ajek. Fleas and fuzzy logic. J. Multiple-Valued Logic and Soft Computing 11(1-2) (2005) 137–152.
10. Petr Savicky´, Roberto Cignoli, Francesc Esteva, Llu´ıs Godo, and Carles Noguera. On product logic with truth constants. J. Logic and Computation 16(2) (2006) 205–225.
11. Siegfried Gottwald. Fuzzy set theory with t-norms and ϕ-operators. In: A. di Nola and A.G.S. Ventre (eds.) The Mathematics of Fuzzy Systems, vol. 88 of Interdisciplinary Systems Res., pp. 143–195. T¨UV Rheinland, K¨oln (Cologne), 1986.
12. Siegfried Gottwald. Fuzzy uniqueness of fuzzy mappings. Fuzzy Sets and Systems 3 (1980) 49–74.
13. Tommaso Flaminio and Enrico Marchioni. T-norm based logics with an independent involutive negation Fuzzy Sets and Systems 157(24) (2006) 3125– 3144.
14. Ulrich H¨ohle. On the fundamentals of fuzzy set theory. J. Math. Analysis Applications 201 (1996) 786–826.
15. S´andor Jenei and Franco Montagna. A proof of standard completeness for Esteva and Godo's logic MTL. Studia Logica 70 (2002) 183–192.

शेती - शेतकरी आणि मध्यमवर्ग

शैलजा भारतराव बरुरे
सहयोगी प्राध्यापक तथा संचालिका
राज्यशास्त्र संशोधन केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई
shailajabarure@gmail.com

भारताचे वर्णन कृषीप्रधान देश असे केले जाते. या कृषीप्रधान देशात शेती आणि शेतकरी यांच्या हितास प्राधान्य मात्र नाही.भारतातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती आहे. हा व्यवसाय त्यांच्यावर सक्तीने लादला जातो आहे. ज्या मुलांचा शेतकरी कुटुंबात जन्म होतो, त्या मुलांना वडिलोपार्जित शेती कसल्याशिवाय पर्याय असत नाही.शेती शिवाय कुठलीही कौशल्य अथवा उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध नसल्याने शेती करणे हा एकच पर्याय त्यांच्यापुढे आहे. जो व्यवसाय शासकीय धोरणाचा केंद्रबिंदू नाही व ज्याकडे कोणी आकर्षित होत नाही ,असा व्यवसाय , उद्योग अथवा उदरनिर्वाहाचे साधन भरभराटीचे साधन असत नाही. आज शेतीतून कोणताच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय लाभ होत असताना दिसत नाही. सद्यस्थितीत शेती आणि शेतकरी दोघेही दुरावस्थेत आहेत. भारतात लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकरी आत्महत्या ही रोजची बातमी झाली आहे. भारतातील आजचा शेतकरी मध्यमवर्गीय नाही. ज्याची उपजीविका शेती आहे त्यालाच शेतकरी म्हटले पाहिजे. शेती अनेकजण करतात परंतु ते शेतकरी नाहीत. शहरातला मध्यमवर्गीय माणूस आपले अधिकचे पैसे गुंतवण्याचे माध्यम म्हणून शेतीकडे पाहतो. त्यामुळे आज गावोगावी अनेक उद्योगपती, अधिकारी व राजकारणी यांनी आपले फार्म हाऊस निर्माण केले आहेत. प्रस्तुत लेखांमध्ये जो माणूस शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहतो त्याच शेतकऱ्याचे व त्यांनी केलेल्या शेतीचे वर्णन करण्यात आलेले आहे.

शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा असे म्हटले जाते. जगाचा पोशिंदा आज चोहोबाजूने नाडला जात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सातत्याने पडणारे दुष्काळ, स्वातंत्र्यानंतरही दुष्काळ, ओला दुष्काळ, सरकारी धोरणे, शेतीसाठी खेळते भांडवल उपलब्ध नसणे त्यातून कर्जबाजारीपणा, त्यातून शेवटचा पर्याय म्हणून आज शेतकरी आत्महत्या करतो आहे. शेतकरी आत्महत्या ही राष्ट्र व समाज या दोहो पुढील आव्हान असताना सुद्धा देशाचा कणा समजला जाणारा मध्यमवर्गीय माणूस मात्र शेती शेतकरी यांच्याकडे संवेदनशीलतेने पाहताना दिसत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यांची वारंवार होणारी कुचंबणा हे विषय मध्यमवर्गीयांच्या विचार विश्वाचे केंद्रबिंदू नाहीत. फार पूर्वीपासून भारतातील सरकारी धोरणांनी मध्यमवर्गीयांची काळजी घेत, शेती आणि शेतकरी यांच्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. आपल्या सरकारी धोरणातून मध्यमवर्गीयांचे पोषण करत असताना शेती आणि शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण केले आहे.' शेतापासून ताटापर्यंत' गुरुदास नूलकर यांच्या पुस्तकात त्यांनी वर्णन केले आहे की 'भारताचे 57% नागरिक शेती व्यवसायात आहेत ;परंतु त्यांची जीडीपी मध्ये योगदान फक्त 17 टक्के आहे. म्हणजेच ,आपल्या

गरीब जनतेत सर्वाधिक आकडेवारी शेतकऱ्यांची आहे.'शेतकऱ्याच्या या दारिद्र्याला निसर्ग जेवढा जबाबदार आहे, तेवढ्या मानवी व्यवस्था ही जबाबदार आहेत.

भारतातील शेतीचा इतिहास हा शेतीच्या लुटीचा इतिहास आहे. छत्रपती शिवराय ,छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे दोन राजे वगळल्यास आत्तापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी भारतातील शेती आणि शेतकरी यांच्या कल्याणाचा विचार केला नाही, असे मत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांनीही व्यक्त केलेले होते.

शेतकऱ्याची जमीन हे गुंतवणूक किंवा भांडवल समजले जात नाही

स्वातंत्र्यपूर्व काळात भारत हा देश अन्नधान्याच्या संदर्भात परावलंबी होता. स्वतःच्या देशातील लोकांना अन्नधान्य पुरवण्याची क्षमता ही शेती आणि शेतकऱ्यांमध्ये नव्हती. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये मात्र हरितक्रांती मुळे भारतीयांची अन्नधान्याच्या बाबतीतील स्वयंपूर्णता ही अभिमानाची गोष्ट म्हणून मिरवली जाते. शेतीचा विकास झाला. मात्र शेतकरी कंगाल झाला. आधुनिक तंत्रज्ञान बी -बियाणे यांचा वापर करून शेतीतून अधिक उत्पादन घेतले जाते त्यामुळे शेतीचा कस कमी- कमी होत जातो. शेतीतून उत्पन्न काढण्यासाठी अधिक अधिक रासायनिक खत ,बी -बियाणे यांचा वापर करून शेतकऱ्याच्या खर्चात वाढ होत राहते .एकीकडे सर्वांच्या अन्नाची गरज भागवत असताना स्वतःचे उत्पन्नाचे साधन म्हणून जमिनीकडे पाहणारा शेतकरी केवळ उत्पादित वस्तू विक्री करूनच लाभ मिळवतो. पण त्याची लाखो रुपयाची जमीन हे भांडवल समजून त्यावर कोणत्याही प्रकारचा परतावा अथवा मूळ गुंतवणूक समजून त्यावर कोणताही लाभ होताना दिसत नाही. इतर उद्योग व्यवसायात मात्र गुंतवणूक व भांडवलावर आधारित वस्तू व सेवांच्या किमती ठरत असतात. यातून वरचेवर शेतकरी दारिद्र्यात ढकलला जातो. दारिद्र्य अवस्थेतील शेतकरी स्वतःची कुचंबना सहन करू शकत नसल्यामुळे आत्महत्येसारखा पर्याय निवडतो. पूर्वी शेतीतून निर्माण होणारा ताण सहन होत नसल्यामुळे केवळ कुटुंब प्रमुख आत्महत्या करीत असे.

मात्र मागील वीस वर्षांमध्ये शेतकरी कुटुंबांनी सामूहिक आत्महत्या केल्याचे प्रकरणे सातत्याने समोर येत आहेत. एवढेच नाही तर महिला शेतकरी सुद्धा आत्महत्या करीत आहेत.

ज्याप्रमाणे इतर उद्योग व्यवसायात यंत्रे व साधनसामग्री यांची दुरुस्ती यासाठी सुद्धा किमतीत काही रक्कम निश्चित केली जाते. त्याप्रमाणे शेतीमालातही वर्षानुवर्ष गुंतवणूक केलेल्या जमिनीचा मोबदला, जमिनीची होणारी झीज भरून काढण्यासाठी म्हणून उत्पादित वस्तूंमध्ये अधिकची किंमत गृहीत धरणे आवश्यक आहे. मात्र असे होताना आढळत नाही. त्यामुळे वर्षानुवर्ष शेतीचे होणारे नुकसान त्यातून शेतीची अनुत्पादकता, उत्पादनातील घट हे नुकसान शेतकरी सहन करीत असतो. शेतीमालाच्या तुलनेत इतर वस्तूंचे भाव सातत्याने वाढत राहतात. शेती आणि शेतीतील उत्पादने मात्र वर्षानुवर्ष स्थिर किमतीत राहतात. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला हेही एक कारण आहे. मध्यमवर्ग हितसंबंधी गट ,दबाव गट, राजकीय पक्ष, विविध संघटना, संस्था यांच्या माध्यमातून स्वहिताची जोपासना करीत असतो .भारतातील शेतकरी मात्र जाती ,धर्मात विभागलेला असल्यामुळे त्याच्या प्रश्नांवर आधारित लढा देणाऱ्या संस्था, संघटना यांची कमतरता आहे. तसेच सर्व शेतकरी एकसंघ होणार नाहीत, याची काळजी सातत्याने मध्यमवर्गीयांची प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्ष घेत असतात. त्यामुळे मतदार असणारा शेतकरी इतर मतदार वर्गाच्या तुलनेने सर्व लाभांपासून वंचित राहतो.

शेती- शेतकरी आणि भारतीय राज्यघटना

शेतकऱ्यांच्या या दुरावस्थेला भारतीय राज्यघटनेतील विविध कायदे व त्यातील तरतुदी कारणीभूत आहेत.

भारतीय राज्यघटनेतील नवव्या परिशिष्टातील शेती व शेतकरी विषयक कायदे जबाबदार आहेत. भारतीय राज्यघटनेच्या नवव्या परिशिष्टात अडीचशे पेक्षा जास्त कृषी विषयक कायदे आहेत. या कायद्यांच्या संदर्भात घटनेने अशी मर्यादा घालून दिली आहे की या कायद्यामुळे होत असणाऱ्या अन्यायाच्या संदर्भात न्यायालयात दाद मागता येत नाही. तसेच या कायद्यात काळाच्या ओघात होणाऱ्या बदलामुळे दुरुस्ती ही करता येत नाही. या कायद्यामध्ये शेतकऱ्याला गळफास ठरलेले प्रमुख तीन कायदे आहेत. 1.आवश्यक वस्तू कायदा 2. जमीन अधिग्रहण कायदा 3. कमाल शेतीजमीन धारणा कायदा .हे तीन प्रमुख कायदे. यामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मते 'जोपर्यंत हे तीन कायदे भारत सरकार रद्द करत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत.' आज सर्वत्र घडत असणाऱ्या आत्महत्या ह्या भारतीय राज्यघटनेच्या नवव्या परिशिष्टाचेच परिणाम आहेत.

शेतीतून निर्माण होणाऱ्या सर्व उत्पादनाचा समावेश आवश्यक वस्तू कायद्यात करण्यात आलेला आहे. या कायद्याला व्यवहारात अनेक लोक जीवनावश्यक कायदा म्हणून ओळखतात. मुळात हा कायदा आवश्यक वस्तू कायदाच आहे. परंतु ब्रिटिश साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्त होत असताना, सरंजामी व जमीनदारी व्यवस्था निर्मूलन करण्याच्या हेतूने जे अनेक कायदे निर्माण करण्यात आले, त्यामध्ये आवश्यक वस्तू कायदा ही निर्माण करण्यात आला. मध्यमवर्गीयांनी मात्र या कायद्याला जीवन आवश्यक कायदा करून या कायद्याच्या माध्यमातून सातत्याने शेती आणि शेतकरी यांचे शोषण केले आहे. शासकीय कर्मचारी अधिकारी अथवा खाजगी क्षेत्रात सेवा करणाऱ्या लोकांना प्रत्येक वर्षी महागाई भत्ता ,घर भाडे, विमा संरक्षण, निवृत्ती वेतन ,इतर सोयी सुविधा मिळत असतात. शेतकऱ्याला मात्र कुठल्याही प्रकारचे महागाई भत्ता ,भौतिक सुविधा व सोयी सवलती मिळत नाहीत. दरवर्षी महागाई सतत वाढत असताना सर्व वस्तू आणि सेवांच्या किमती ठरविण्याचे अधिकार त्या-त्या उत्पादकांना असतात. मात्र आवश्यक वस्तू कायद्यामुळे शेतीमालाचे भाव ठरविण्याचे अधिकार शेतकऱ्याला नसतात. ज्यावेळी एखाद्या जिनसाचे उत्पादन कमी होते. त्यावेळी आपोआप त्या जिन्नसाचे दर वाढतात. असे दर वाढले की मध्यमवर्गीय माणूस महागाईच्या विरोधात आक्रोश करायला सुरुवात करतो. सरकार तात्काळ हस्तक्षेप करून आवश्यक वस्तू कायद्यानुसार त्या शेतीमालाचे भाव कमी करतो. आयात शुल्क कमी करून एक तर ते जिन्नस बाहेरून मागवले जाते व आपल्या देशातील जिन्नसावर निर्यात दर अधिकचे लावून महागाई कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. अशामुळे वर्षानुवर्ष शेतकऱ्याचे दुहेरी शोषण झाले आहे. त्याला बाजार व्यवस्थेत, बाजारपेठेत सातत्याने वाढत जाणाऱ्या महागाईला सामोरे जावे लागते. मजुरी,खत, बी- बियाणे, यंत्र, तंत्रज्ञान, वाहतूक जाहिराती यासाठी तो पैसे खर्च करतो आणि त्याचवेळी स्वतःच्या उत्पादनाचे दर मात्र मागील 75 वर्षात जवळजवळ स्थिर किंवा केवळ चार-पाच टक्क्यांपर्यंत वाढलेले आहेत. यामुळे बाजारपेठेकडून होणारे शोषण व मध्यमवर्गीयांच्या गरजा भागवण्यासाठी सरकारने सातत्याने केलेला हस्तक्षेप यामुळे शेतकरी दुहेरी लुबाडला जातो. त्यामुळे सातत्याने कर्जबाजारीपणा, आत्महत्या, विविध प्रकारच्या विवंचना यातून

त्याच्या गळ्याभोवतीचा फास अधिक घट्ट आवळला जातो. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे मागील दोन महिन्यात वाढलेले टोमॅटोचे भाव या महिन्यात केवळ दोन रुपयांवर आलेले आहेत. ज्या ज्या वेळी कांदा अथवा टोमॅटो महाग होतात, त्या -त्या वेळी शहरी व मध्यमवर्गीय माणूस समाज माध्यमांवर येऊन, दबाव तंत्राचा वापर करीत ,शासनाला हाताशी धरून या शेतीमालाचे भाव स्वस्त करून घेतो. लाखो रुपये कमावणाऱ्या व्यक्तीचे बजेट टोमॅटो व कांद्याचे भाव वाढले की कोलमडते सरकारही तात्काळ त्याची दखल घेते मात्र मागील अनेक दशके शेती आणि शेतकऱ्याचे कोलमडलेले बजेट हा मध्यमवर्गीय ,बुद्धिवंत व सरकारच्या चिंतेचा विषय नसतो.

कमाल जमीन धारणा कायदा ,स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या जमीनदारी व्यवस्था व त्यातून निर्माण होणाऱ्या विषमता, शोषण यावरचा उपाय म्हणून निर्माण करण्यात आला होता. हजारो एकर जमिनी ताब्यात असणाऱ्या व्यक्ती, कालांतराने भारतीय राजकारणात सक्रिय नेते म्हणून नावारूपास आले .ज्यांच्याकडे हजारो एकर जमिनी होत्या, त्यांच्या त्या जमिनी तशाच कायम राहिल्या. कारण या माणसांनी कायद्यातून अनेक पळवाटा निर्माण केल्या. परंतु ज्यांचा उदरनिर्वाह शेतीवर होता .अशा लोकांना मात्र या अधिकच्या जमिनी काढून घेऊन सरकारने त्यांना अल्पभूधारक बनवून टाकले आहे .वर्षानुवर्ष विभक्त कुटुंब पद्धतीचा परिणाम म्हणून शेतीचे होणारे विभाजन व त्यातून हळूहळू अल्पभूधारक शेतकऱ्यांची वाढती संख्या यामुळे शेतीशी बांधला गेलेला व्यक्ती योग्य व उत्तम प्रकारे शेती करू शकत नाही. कारण शेतीसाठी लागणारे मनुष्यबळ व भांडवल त्याच्याजवळ उपलब्ध नाही व दुसरीकडे मात्र कमाल जमीन धारणा कायदा हा केवळ शेतकऱ्यांसाठी लागू आहे. उद्योग व व्यवसायासाठी मात्र भांडवलदार उद्योगपती मोठ्या प्रमाणात जमिनी ताब्यात ठेवू शकतात

त्यामुळे भारतीय राज्यघटनेने शेतकऱ्याला या कायद्याच्या माध्यमातून आर्थिक स्वातंत्र्यावर निर्बंध घातले आहेत. एकीकडे आवश्यक वस्तू कायदा, दुसरीकडे कमाल जमीन धारणा कायदा या कायद्यान्वये शेतकऱ्याला आपल्या व्यवसायात कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य घेता येत नाही. राज्यघटनेत सर्व व्यक्ती कायद्यापुढे समान असे म्हटले जात असले तरी सुद्धा कमाल जमीन धारणा कायद्यामुळे शेतकऱ्याला जमिनी ताब्यात ठेवण्यासाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. त्याच वेळी उद्योग व व्यवसायासाठी मात्र जमिनी ताब्यात ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची मर्यादा घालण्यात आलेली नाही. यामुळे स्वतःच्या मालकीची जमीन असणारे शेतकरी मोठ्या शेतकऱ्याकडून अल्पभूधारकांमध्ये परावर्तित होताना दिसतात व शहरी मध्यमवर्गीय माणूस जो उद्योगपती अथवा सरकारी अधिकारी किंवा राजकारणी आहे तो आपले अधिकचे पैसे गुंतवण्यासाठी मात्र शेतीचा उपयोग करून घेताना दिसतो. त्यामुळे आज ग्रामीण भागात जमिनीचे भाव वाढले आहेत. जमिनी खरेदी करण्याची क्षमता आता कोणत्याही शेतकऱ्यात राहिलेली नाही. नव्याने जमीन फक्त शहरी व मध्यमवर्गीय माणूसच खरेदी करू शकतो. कारण जागतिकीकरणाने या मध्यमवर्गीय माणसाच्या पगारी व सुख सुविधांमध्ये भरमसाठ वाढ केलेली आहे. त्यामुळे हा नव मध्यमवर्गीय माणूस अत्यंत श्रीमंत गटांमध्ये आता त्याचा प्रवेश झालेला आहे .त्यामुळे एकीकडे तो सरकार ताब्यात ठेवतो तर दुसरीकडे ग्रामीण भागातल्या सामान्य शेतकऱ्यावरही त्याचे नियंत्रण प्रस्थापित होताना दिसते. हाच माणूस जेव्हा शेतमालाचे भाव वाढतात तेव्हा अतिशय हुशारीने आपल्या गृहिणीच्या माध्यमातून व्यथा मांडत माध्यमांवरती आरडाओरडा करत, मोर्चे काढत ,शेतीमालाचे भाव पाडताना दिसून येतो.

शेती आणि शेतकऱ्यांना गरिबी व विषमतेत ढकलून देणारा तिसरा कायदा म्हणजे जमीन अधिग्रहण कायदा होय. विविध शासकीय उपक्रमांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या जातात. या जमिनी काढून घेताना शेतीचा योग्य तो भाव दिला जात नाही. पूर्वी अशा जमिनी काढून घेण्यासाठी किमान शेतकऱ्यांची पूर्वसंमती आवश्यक मानली जात असे. मात्र आता नवीन कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय अशा जमिनी ताब्यात घेण्याचे अधिकार शासनास मिळाले आहेत .यामुळे शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय झालेला आढळून येतो. औद्योगिक वसाहती निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्यास त्या कुटुंबाला उदरनिर्वाहाचा कोणताही मार्ग उपलब्ध असत नाही. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे लातूर येथील हरंगुळ बुद्रुक या गावच्या 300 पेक्षा अधिक लोकांच्या जमिनी एमआयडीसी साठी सरकारने ताब्यात घेतल्या व या जमिनीला अत्यल्प भाव दिला. या जमिनीचा परतावा योग्य प्रमाणात दिला नाही व जेव्हा शेतकऱ्यांनी कोर्टात धाव घेतली त्यावेळी एमआयडीसी व सरकारच्या वतीने केल्या गेलेल्या प्रतिवादाने शेतकऱ्यांनाच आपल्याला वीस वर्षांपूर्वी मिळालेला परतावा अधिक होता. त्यामुळे तो आता व्याजासकट परत करण्याचे आदेश दिले आहेत. मुळात ज्यांच्या जमिनी काढून घेतल्या ते मोठे शेतकरी ही अल्पभूधारक झाले. अशी उदाहरणे मोठ्या शहरांच्या अवतीभवती सर्रासपणे घडत असल्याचे आढळून येते.

शेती व शेतकरी यांच्या विषयी अज्ञान

भारतातील अनेक कवी आणि लेखकांनी शेती आणि शेतकऱ्यांची अत्यंत रसभरीत वर्णने केलेली आहेत . ही वर्णने वास्तवास धरून नाहीत.तसेच भारतीय शेतकऱ्यांचे उपद्रव मूल्य अत्यंत कमी असल्यानेही त्याच्या अडचणीमध्ये वरचेवर वाढ होताना दिसते. भारतात आत्तापर्यंत आलेली सर्वच सरकारी शेती आणि शेतकऱ्याकडे दुर्लक्ष करीत या परिस्थितीतही शेतकरी कोणत्याही राजकीय पक्षाला आपल्या दुराअवस्थेस कारणीभूत ठरवीत नाही.कृषी विषयक धोरण ठरत असताना ज्यांनी कधीही शेती केली नाही असे तज्ञ हे धोरण ठरवत असतात. त्यामुळे शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भातील अज्ञानातूनही शेतकऱ्यावर अन्याय होताना आढळून येतो. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजातला एक वर्ग अत्यंत हालाखीचे जीवन जगत असताना त्याच्या संदर्भात सखोल माहिती असणे त्याचे प्रश्न समजून घेणे, त्यावर तार्किक पद्धतीने उत्तर शोधणे यासाठी शिक्षण, अर्थव्यवस्था, समाज व्यवस्था या कमी पडतात म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न वर्षानुवर्ष तसेच कायम आहेत.

वर्षानुवर्ष शेती ही तोट्यात चालते आहे. त्यामुळे त्यांना स्वतःचे उदरनिर्वाह अथवा कुटुंबीयांच्या गरजा भागवणे, त्यांचे गरजांचे अग्रक्रम ठरविणे कठीण अथवा बिकट होते. अशावेळी सरकार व एमआयडीसीला शेतीतून पूर्वी मिळालेल्या परताव्याचा व्याज व परतावा परत करणे कसे शक्य आहे? याचाच अर्थ भारतातील शासनाच्या तीनही प्रमुख अंगामध्ये शेती व शेतकरी याविषयी कुठल्याही प्रकारची आस्था आढळून येत नाही. 1951 साली हे नववे परिशिष्ट निर्माण केले गेले. याचाच अर्थ त्यावेळच्या कायदेमंडळात, कार्यकारी मंडळात व तेव्हाच्या न्याय व आजच्या न्यायव्यवस्थेतही शेतकऱ्यांच्या संदर्भात संवेदनशीलतेने विचार केला गेलेला नाही. अमर हबीब लिखित 'शेतकरी विरोधी कायदे पुस्तिका' या कायद्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची सविस्तर चर्चा करताना आढळते. या पुस्तकात अमर हबीब मध्यमवर्गीयांना 'बांडगुळ' असा शब्द वापरतात .मध्यमवर्गीय माणसाने स्त्रिया, शेतकरी व जमीन या तीनही सर्जकांचे मोठ्या प्रमाणात शोषण केल्याचे आढळून येते. आज सर्वत्र

होणारे स्त्रियांचे शोषण, जमिनीचा होणारा गैरवापर व शेतकऱ्याला विविध मार्गाने कुंठीत केल्यामुळे आज सर्वत्र सर्जक अडचणीत आहे.

कल्याणकारी राज्य व शेतकरी

भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे .यामुळे दारिद्र्यरेषेखालील सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य ,शिक्षण पुरवण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. त्यातून स्वस्त धान्य अथवा अन्न सुरक्षा विधेयकासारखी विधेयके सर्रास पुढे येताना दिसतात. केवळ दोन-तीन रुपयांमध्ये भरपूर धान्य मिळाल्याने शेतीमध्ये श्रम करण्यासाठी मजूर उपलब्ध असत नाही. यामुळे शेतकरी चढ्या भावाने मजुरी देतो. दुसरीकडे धान्य उत्पादक म्हणून तो बाजारामध्ये लुबाडला जातो. कारण त्याने निर्माण केलेल्या वस्तूंचे भाव ठरविण्याचा त्याला अधिकार असत नाही. शेतकरी हा कामगार अथवा मजुरांच्या विरुद्ध नसला तरीसुद्धा सरकारच्या कल्याणकारी राज्य या अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या अनेक उपक्रमांचा परिणाम म्हणून शेती व शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात विषमतेत व शोषणात वाढ होताना दिसते. कार्ल मार्क्सच्या म्हणण्यानुसार ज्याप्रमाणे कामगारांचे श्रम हे त्या दिवसाचे नाशवंत भांडवल असते.ते त्या दिवशी वापरूनच त्यावरचे श्रममुल्य निर्माण करणे कामगाराला शक्य झाले तरच त्या श्रमातून तो स्वतःची उदरनिर्वाह भागू शकत असे .कामगारांना मार्क्स सारखा नेता मिळाल्याने त्यांच्या जीवनात स्वातंत्र्य व समता निर्माण झाल्याचे आढळून येते. मात्र जगभरामध्ये शेती व शेतकरी यांची अवस्था उन्नत होत असताना, भारतात मात्र शेती व शेतकऱ्यांना योग्य नेतृत्व न मिळाल्याने शेतकरी वरचेवर गरीब होताना आढळून येतो. कारण शेतीतून मिळालेले उत्पादन त्याला दीर्घकाळ साठवता येत नाही .आजही गावांमध्ये अथवा तालुका च्या ठिकाणी धान्य साठवून ठेवणारी कोठारे उपलब्ध असत नाहीत. स्वतः शेतकऱ्याकडे तर ती असतच नाहीत. यामुळे शेतीतून निघालेले उत्पन्न त्याला वर्ष दोन वर्षाच्या आत विकावे लागते. यामुळे आवक ज्या प्रमाणात असते त्या प्रमाणात भावही ठरत जातात. दरवर्षी शेतीतून निघणारा माल अत्यल्प दरात विकला जातो. शेती करण्यासाठी हंगामापूर्वी शेतकऱ्यांना कुठलेही अनुदान अथवा गुंतवणूक करण्यासाठी भांडवल मिळत नाही .त्यामुळे तो सरकारी अथवा खाजगी कर्जे घेऊन शेती करतो. दरवर्षी कोणत्या ना कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्ती निर्माण होतात . यामुळे केलेली गुंतवणूक ही शेतकऱ्याला परत मिळत नाही. खरं म्हणजे शेतकऱ्याला दरवर्षी शेतीतून उणे उत्पादन मिळत असते .याकडे कोणतेही अभ्यासक, संशोधक सरकार व मध्यमवर्गीय चिंतेचा विषय म्हणून पहात नाही .त्यामुळे भारतात शेतकऱ्यांनाही आपली मुलं शेतकरी व्हावे असे वाटत नाही. हळूहळू शेतीतून मनुष्यबळ कमी होते आहे. दुसरीकडे विविध क्षेत्रात मनुष्यबळाला आकर्षित करून घेतले जात असले तरी शेतीतील मात्र आकर्षण कमी झाले आहे.

भारतीय शेतकऱ्यांना विषमतेच्या खाईत लोटणारे पारंपारिक स्त्रोतही भारतात आहेत. महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये भारतातील शेतकऱ्यांना जात ,धर्म व विविध कर्मकांडांच्या नावाने कशा पद्धतीने लुटले जाते, याचे वर्णन उदाहरणासहित केले आहे .शेतकऱ्याचे मूल जन्माला येण्यापूर्वीच विविध विधी व कर्मकांडे सुरू होतात .तो शेतकऱ्याच्या मृत्यूनंतरही त्याला लुटणारे विधी सुरूच असतात. आजही या प्रकारच्या धार्मिक रूढी, परंपरा व कर्मकांड यांच्यामध्ये फारसा फरक पडलेला नाही .त्यामुळे शेतकरी आजही लुटला जातो.

शेती आणि शाश्वत विकास

आज जगभरात हवामान संकट, पर्यावरण प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास या विषयांची जोरदार चर्चा होते .यावर उपाय म्हणून शाश्वत अथवा चिरंतनिकास या संदर्भात विविध तज्ञ आपली मते मांडत असतात. व्यक्तीचे पोषणमूल्य दर्जेदार व्हावे यासाठी सर्व अन्नपदार्थ सेंद्रिय पद्धतीने पिकवण्याची भाषाही वापरली जाते .केवळ शेतीमाल सेंद्रिय पद्धतीने निर्माण करणे हा एकच पर्याय या तज्ञांसमोर आढळतो. मात्र शहरी व मध्यमवर्गीय माणूस वापरत असणारा इंधन साठा त्यातून निर्माण होणारे प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास याविषयी काहीही बोलले जात नाही. विविध उद्योग व्यवसायातून निर्माण होणारा घनकचरा, वायु प्रदूषण, जल प्रदूषण याविषयीही मौन बाळगले जाते. शहरांमध्ये वापरले जाणारे प्लास्टिक, थर्माकोल तसेच चंगळवादी जीवनशैली यामुळे होणारे निसर्गाचे शोषण व त्यातून एक योग्य अशी आचारसंहिता निर्माण करण्याची गरज शहरी , मध्यमवर्गीय माणसास व समाजचिंतकास वाटत नाही .मात्र केवळ शेतकऱ्यांनी आपली शेती रासायनिक व यांत्रिकी पद्धतीने न करता ती सेंद्रिय पद्धतीने करावी. मध्यमवर्गीय माणसाची, शहरी माणसाच्या जीवनाची काळजी वहावी,अशी तीव्र तळमळ सर्वजण व्यक्त करीत असतात. परंतु ज्याला मरणकळा प्राप्त झाली आहे ,अशा शेतकऱ्याला त्याचे जीवन सुखकर व्हावे, यासाठी त्याला कुठल्याही सुख सुविधा, निवृत्तिवेतन ,आरोग्य विषयक योजना या संदर्भात हा मध्यमवर्गीय माणूस कुठेही 'ब्र' काढताना दिसत नाही.

भारतीय शेतकरी आज सर्वत्र चिंतेत आहे. याची विविध कारणे आहेत. यामध्ये नैसर्गिक संकटे, याबरोबर शासकीय ध्येय धोरणे , मध्यमवर्गाची शेतकऱ्यांच्या प्रति असणारी उदासीनता हेही महत्त्वाचे कारण आहे. वाढती महागाई, आपल्या गरजा पूर्ण न करू शकण्याचे ताण तणाव ,मुलांची शिक्षण विवाह विषयक प्रश्न, याबरोबरच भारतीय राज्यघटनेने नवव्या परिशिष्टातून शेतकऱ्यावर घातलेली न्याय बंदी, हेही महत्त्वाचे कारण असल्याने आज भारतीय शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्करतो आहे.

'पोशिंद्याचे आख्यान एक प्रश्नपनिषद' या पुस्तकात रमेश जाधव यांनी शेतीचे प्रश्न हे राजकीय प्रश्न असल्याचे म्हटले आहे. स्वातंत्र्यानंतर सर्व शासकीय ध्येय धोरणांनी औद्योगीकरणाला महत्त्व दिले व शेतकऱ्यांच्या शोषणाचा पाया नक्की केला. आत्तापर्यंतच्या ध्येय धोरणांनी शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न सोडविण्याऐवजी सातत्याने कर्जमाफी अथवा अनुदान देत शेतकऱ्यांना जगाचा पोशिंदा न ठेवता राजकीय पक्षांचे

मागतकरी अशा भूमिकेत ठेवल्याचे रमेश जाधव यांनी म्हटले आहे. भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले तरी कृषी क्षेत्रात मात्र आजही अनेक प्रकारची बंदी असल्याने मुक्त बाजारपेठ हे शेतकऱ्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले आहे. सर्व उद्योग, व्यवसायिकांना मुक्त बाजारपेठेत स्वतःच्या वस्तू व सेवांचे मूल्य व किमती ठरविण्याचा अधिकार असताना मात्र शेतकऱ्यांना आवश्यक वस्तू कायद्यानुसार स्वतःच्या वस्तूंच्या किमती ठरविण्याचा अधिकार नाही. त्यामुळे एकाच देशात राहणाऱ्या दोन वेगवेगळ्या नागरिकांना दोन वेगवेगळ्या कायद्यान्वये जीवन जगण्यास भाग पाडल्याने शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय होतो.

प्रस्तुत लेखाचा उद्देश केवळ शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नांचा उहापोह करणे एवढाच नाही . शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी मध्यमवर्गीयांच्या शेती व शेतकऱ्यांच्या संदर्भातील धारणा बदलणे आवश्यक आहे. मध्यमवर्गीयांनी आत्मपरीक्षण, आत्मचिंतनाच्या माध्यमातून शेतीच्या प्रश्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे .यामध्ये प्रसारमाध्यमही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. आपल्याला जगण्यासाठी सातत्याने ज्या प्रमाणात वेतन भत्ते वाढणे आवश्यक आहे, त्या प्रमाणात शेतीमालाचे भाव वाढल्यानंतर मध्यमवर्गीयांनी आरडाओरडा न करता शेतकऱ्याला सुद्धा जीवनावश्यक गरजा असतात, त्या भागविण्यासाठी बाजाराच्या व महागाईच्या प्रमाणात शेतीमालाला योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे, याचे भान ठेवले तर शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सुटू शकतील .आज ग्रामीण भागातील शेतकरी मृतअवस्थेत आहेत .अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. अनेक जण जिवंत असूनही मृतांसारखे जीवन जगत असतात .त्यांच्यामध्ये सरकारला धारेवर धरणे, प्रश्न विचारणे, दबाव गट निर्माण करणे, उपद्रव मूल्य निर्माण करून आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी कोणतेही बळ शिल्लक राहिलेले नाही .आपला देश बांधव संकटात असताना आपण त्याच्या वतीने सरकारला त्याच्या संदर्भात योग्य ते कारवाई करण्यासाठी मध्यमवर्गाने पुढाकार घेणे आवश्यक आहे . अरिस्टोटलच्या काळापासून ते कार्ल मार्क्सच्या काळापर्यंत, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही मध्यमवर्गीयांनी अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे .हा इतिहास असताना मध्यमवर्गाने भारतातील शेतकऱ्याच्या संदर्भात पुन्हा एकदा चळवळ उभी करून शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जमीन हे शेतीचे भांडवल समजून त्याची होणारी चीज गृहीत धरली पाहिजे. तसेच हंगामापूर्वी शेतकऱ्याला खेळते भांडवल मिळाले पाहिजे. याशिवाय शेती आणि शेतकऱ्यांच्या संदर्भातील अन्याय करणारे सर्व कायदे दूर करण्यासाठी अथवा रद्द करण्यासाठी मध्यमवर्गीय नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे .यासाठी शेतकरी विरोधी कायद्यांचा अभ्यास करणे व सरकारला ते कायदे रद्द करण्यासाठी दबाव निर्माण करणे यासाठी मध्यमवर्ग नेतृत्व करू शकेल, एवढे नक्की.

संदर्भसूची

1. अंगार वाटा शोध शरद जोशींचा- भानू काळे-उर्मी प्रकाशन पुणे
2. शेतकरी विरोधी कायदे पुस्तिका- अमर हबीब- परिसर प्रकाशन अंबाजोगाई
3. समतेचे निर्मिक महात्मा ज्योतिराव फुले- समग्र वाड.मयखंड 1-प्रतिमा पब्लिकेशन्स पुणे
4.शेतापासून ताटापर्यंत- गुरुदास नलुरकर- मनोविकास प्रकाशन पुणे